पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११०१८
जाहिर प्रकटन
जुन्या इमारतींचे संरचनात्मक परिनिरीक्षण
करण्यासाठी बांधकाम अभियंते नोंदणीकृत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासनाचे राजपत्र अधिसुचना १४ जानेवारी २००९ आणि महाराष्ट्र शासनाचे राजपत्र अधिसुचना दिनांक ०८/०७/२०११ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २६५ मध्ये सुधारणा करणेबाबतचे अध्यादेश पारित केले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे २६५ (अ) च्या कलमानुसार जुन्या इमारती अथवा मिळकती राहण्यासाठी योग्य आहेत किंवा नाहित याबाबत मनपाकडील परवानाधारक बांधकाम अभियंत्याकडून तपासणी व आवश्यक त्या दुरूस्त्या करून बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल करणेच्या कार्यवाहीबाबतची तरतूद करणेत आलेली आहे.

सदर अधिसूचनेनुसार पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील ज्या इमारतींची बांधकामे ३० वर्षापूर्वीची आहेत अशा सर्व इमारतींचे मालक वारसदार व भोगवटादार यांना इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे मनपाकडील परवानाधारक बांधकाम अभियंता (स्ट्रक्चरल इंजिनिअर) याचंकडून प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य करण्यात आले आहे तसेच त्यानंतर दर १० वर्षानी असे प्रमाणपत्र घेणे इमारतींचे मालक वारसदार व भोगवटादार यांचेवर बंधनकारक करण्यात आले आहे. बांधकाम सुस्थितीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी बांधकाम अभियंता यांचेकडे पिंपरी चिंचवड मनपाचा परवाना असणे आवश्यक आहे. त्या करिता बांधकाम अभियंता यांनी पिंपरी चिंचवड मनपाकडे आवश्यक ती कागदपत्रे जोडून अर्ज केल्यास व सर्व निकषांची पूर्तता झाल्यास संबंधितांना रक्कम रू. १०००/- ना परतावा शुल्क आकारून तीन वर्षासाठी परवाना देता येईल व नुतनीकरणासाठी फी रक्कम रू. २५०/- किंवा त्या वेळेस लागु असलेले शुल्क भरावी लागेल. याबाबत आवश्यक कागदपत्रांची माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वेबसाईटवर व शहर अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत. तसेच सदर सुचनेबाबत ठळक बाबी पुढील प्रमाणे आहेत.

1) बांधकाम अभियंता यांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्या पात्रतेसंबंधी तपासणी करताना गुणात्मक विचार करून अर्हतेबद्दल निश्चित निर्णय घेण्याचा अथवा त्यामध्ये बदल करण्याचा अथवा पात्रता ग्रहण केलेली असतानाही प्रत्यक्ष चौकशी अंती एखादा अर्ज अपात्र करण्याचा अधिकार शहर अभियंता यांना राहिल.

2) स्ट्रक्चरल ऑडिटसाठी आकारावयाची फी संबंधित व्यक्ति यांनी इमारतीच्या मालकाकडून परस्पर वसूल करावी. या कामासाठीचे फी चे निकष आणि मोजमापे, तसेच त्यासंबंधीचे निर्माण होणारे कोणतेही वादविवाद यांचा पिंपरी चिंचवड मनपाशी कोणताही संबंध राहणार नाही. सदर फी चा तपशील मनपा कार्यालयात उपलब्ध आहे.

3) उपरोक्त अधनियमाच्या कलम २६५ (अ) मधील तरतूदींनुसार इमारत बांधकामदृष्ट्या सुस्थितीत आहे किंवा नाही? याबाबत बांधकाम अभियंत्याकडून करण्यात येणा-या परीनिरीक्षणात इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधकाम सुस्थितीची तपासणी करून अविघातक चाचणीबरोबरच इतर चाचण्या व त्यासंबंधीच्या अभिलेखाची तपासणी करण्याचा समावेश आहे.

4) बांधकाम अभियंत्यांच्या नोंदणीसाठी अर्हता आणि पात्रता निकष महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि. ८/०७/२०११ च्या अधिसुचनेमधील नियम क्र.४ अन्वये खालीलप्रमाणे असणे आवश्यक

क) कोणत्याही मान्यताप्राप्त भारतीय किंवा विदेशी विद्यापीठातील स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी किंवा सनदी अभियंता किंवा भारतीय अभियांत्रिकी संस्थेच्या समतुल्य विदेशी संस्थेच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील सहयोगी सदस्य

ख) संकल्पचित्र काढण्याचा व क्षेत्र कामे करण्याचा बांधकाम अभियंता व्यवसायातील किमान ३ वर्षाचा अनुभव परंतु असे की पोटकलम (ख) मध्ये करारनिर्दिष्ट केलेला ३ वर्षाच्या अनुभवाचा निकष

१) बांधकाम अभियंता या शाखेतील कोणत्याही मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची किंवा विदेशी विद्यापीठीची पदव्युत्तर पदवी धारण करणा-या व्यक्तिच्या बाबतीत २ वर्षे

Scanned with OKEN Scanner

२) बांधकाम अभियंता या विषयातील डॉक्टरेट धारण करणा-या व्यक्तिबावत ही अट एक वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

बांधकाम अभियंता नोंदणीसाठी वरीलप्रमाणे अर्हता आणि पात्रता निकष धारणा करणा-या संबंधितांनी शहर अभियंता कार्यालय येथे आवश्यक कागदपत्रांसह लेखी अर्ज, सदरची सुचना प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्यात सादर करावा. तदनंतर बांधकाम अभियंत्यांची नोंदणी यादी तयार करणेत येईल व सदरची नोंदणी प्रमाणपत्रे निर्गमित केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षासाठी वैध राहणार आहेत. कुठलाही अर्ज स्वीकारण्याचा अथवा फेटाळण्याचा हक्क महापालिका आयुक्तांकडे राहील. सदरची नोटीस मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जाहिरात क्र. ७८
दिनांक ३०/०७/२०२४

शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८

Scanned with OKEN Scanner